# ५. सहकारी पतपुरवठा संस्था
## (Credit Co-operative Society)

५.१ प्रस्तावना
५.२ अर्थ व व्याख्या
५.३ वैशिष्ट्ये
५.४ कार्ये
५.५ सारांश
५.६ महत्त्वाच्या संज्ञा
५.७ स्वाध्याय




सहकारी पतपुरवठा संस्था

### ५.१ प्रस्तावना (Introduction) :

भारतात सहकारी चळवळीची सुरुवात सहकारी पतपुरवठा संस्थांच्या स्थापनेद्‌वारे झाली. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अल्प व मध्यम मुदतीचे कर्ज पुरविण्याच्या उद्‌देशाने या संस्थांची स्थापना केली गेली. पूर्वीच्या काळी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कर्जपुरवठा सावकारांकडून केला जात होता. मात्र सावकार शेतकऱ्यांचे शोषण व पिळवणूक करीत असत. अशा पिळवणूकीतून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी व शेतीक्षेत्राची कर्जविषयक गरज पूर्ण करण्यासाठी ब्रिटिश सरकारने सन १९०४ मध्ये सहकारी पतपुरवठा संस्थांच्या स्थापनेला गती दिली. सहकारी पतपुरवठा संस्थांची स्थापना ही ग्रामीण भागातील सावकारी वर्चस्वाला एक सक्षम पर्याय म्हणून करण्यात आली. ब्रिटीश सरकारने ''सहकारी पतपुरवठा संस्था कायदा १९०४'' संमत केला. या कायद्यातील तरतूदीनुसार पतपुरवठा सहकारी संस्थांची स्थापना प्रत्येक गाव व खेड्यामध्ये करण्यात आली.

### सहकारी पतपुरवठ्याची त्रिस्तरीय रचना

व्यापारी, उद्योजक, व्यावसायिक यांना व्यापारी बँका, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, नागरी सहकारी पतसंस्था कर्ज पुरवठा करतात. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, कारागीर, लहान व्यावसायिक व इतर दुर्बल घटकांना कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी बँका कार्य करतात. सहकारी पतपुरवठ्याची रचना त्रिस्तरीय आहे. राज्य पातळीवर राज्य सहकारी बँक, जिल्हा पातळीवर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, गावपातळीवर प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन झालेल्या आहेत. सावकारांकडून केले जाणारे आर्थिक शोषण, फसवणूक यापासून मुक्तता करण्याच्या हेतूने सहकारी पतपुरवठा संस्थाची स्थापना केली जाते.




## ५.२ अर्थ (Meaning) :

सहकारी तत्त्वावर शेती व्यवसायाच्या विकासासाठी योग्य व वाजवी व्याज दराने पुरेसा कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था म्हणजेच सहकारी पतपुरवठा संस्था होय.

ज्या गावात किंवा खेड्यामध्ये सहकारी पतसंस्था स्थापन केली जाते,ते गांव किंवा खेड्यापुरते त्या संस्थेचे कार्यक्षेत्र मर्यादित असते. त्या गावातील शेतकरी, कारागीर, लहान व्यावसायिक इत्यादी त्या संस्थेचे सभासद असतात. सभासदांना बचतीची सवय लावतात. शेतकरी सभासदांना कमीत कमी व्याजदराने वेळेवर कर्जपुरवठा करतात. कृषिक्षेत्राचा, शेतकऱ्यांचा आर्थिक विकास घडवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्नशील असतात. सहकारी पतपुरवठा संस्था प्राथमिक पातळीवर सभासदांची गरज लक्षात घेऊन त्यानुसार कर्जपुरवठा करतात, संस्थांचा कर्जव्यवहार प्रत्यक्ष सभासदांशी होतो, म्हणून त्यांना प्राथमिक सहकारी पतसंस्था असे म्हणतात. सहकारी पतपुरवठा संस्था ग्रामीण व शहरी भागात कार्य करतात.

### व्याख्या – (Definition) :

१) "संपत्तीचा किंवा आर्थिक स्थितीचा आधार न घेता आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तिंजवळील उपलब्ध तारण स्वीकारून आणि त्यांच्या सोयीस्कर अटींवर बँकिंग व्यवहार करणारी संस्था म्हणजे सहकारी पतपुरवठा संस्था होय."

**– हेन्री वुल्फ**

२) "शेतमालाचे उत्पादन वाढविण्यासाठी व शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अल्प व मध्यम मुदतीचे कर्ज देण्याबरोबरच शेती उपयुक्त वस्तू, विविध सेवा, जीवनावश्यक वस्तू पुरविणे व शेतमालाचे पणन करणे इत्यादी क्रिया करण्यासाठी लोकांनी स्वेच्छेने स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी पतपुरवठा संस्था होय.''

## ५.३ सहकारी पतपुरवठा संस्थेची वैशिष्ट्ये (Features of Co-operative Credit Society) :




सहकारी पतपुरवठा संस्थेची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे सांगता येतील.

१) **खुले व ऐच्छिक सभासदत्व :** सहकारी पतपुरवठा संस्थेचे सभासदत्व सर्वांसाठी खुले असते. ग्रामीण भागातील शेतकरी, कारागीर व दुर्बल घटक स्वेच्छेने एकत्रित येऊन त्यांच्या आर्थिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सहकारी पतपुरवठा संस्थेची स्थापना करतात. सभासदत्वासाठी कोणत्याही व्यक्तिला सक्ती केली जात नाही.

२) **संस्थेचा उद्देश :** सभासद शेतकऱ्यांना शेती उत्पादनासाठी अल्प व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करणे, कर्ज रकमेच्या वापरावर नियंत्रण ठेवणे, कृषी कार्यक्रमात सहभाग, बचतीला प्रोत्साहन, कर्ज वसुली, मार्गदर्शन, नवीन संशोधनाची सभासदांना माहिती देणे इत्यादी उद्देशाने सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन करतात.

३) **संस्थेचे कार्यक्षेत्र :** संस्था ज्या गावात स्थापन झालेली असते त्या गावापुरते संस्थेचे कार्यक्षेत्र असते. आता हे अंतर चार ते पाच कि.मी. परिसरात येणाऱ्या गावापुरते मर्यादित करण्यात आले आहे. परिसरातील तीन हजार व्यक्तिंना किंवा पाचशे शेतकरी कुटुंबांना संस्थेच्या सेवेचा फायदा व्हावा अशी अपेक्षा असते.

४) **मर्यादित भांडवल :** सहकारी पतपुरवठा संस्थांचे सभासद हे शेतकरी, शेतमजूर, लहान कारागीर या सारखे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक असल्यामुळे त्यांची भाग खरेदी क्षमता खूपच कमी असते. त्यामुळे संस्थेची भांडवल उभारणी क्षमता मर्यादित असते.

५) **कृषी उत्पादन साधनांच्या खरेदीसाठी कर्जपुरवठा :** शेतकरी सभासदांना बी-बियाणे, खते, किटकनाशके, तणनाशके इत्यादी कृषी उत्पादन साधनांच्या (Inputs) खरेदीसाठी या सहकारी पतपुरवठा संस्थांकडून कर्जपुरवठा केला जातो.

६) **जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांशी संलग्न :** प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था ज्या जिल्ह्यामध्ये स्थापन झालेल्या असतात, त्याच जिल्ह्याच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांशी संलग्न असतात. सहकारी पतपुरवठा संस्था सभासदांना द्यावयाच्या कर्जाची योजना तयार करतात व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना सादर करतात. या बँकेच्या मदतीने वा मार्गदर्शनाप्रमाणे सभासदांना कर्ज पुरवठा केला जातो.

७) **ग्रामीण पतपुरवठा रचनेत महत्त्वाचे स्थान :** सहकारी पतपुरवठा संस्थांचा प्रत्यक्ष संबंध शेतकरी सभासदांशी असतो. त्यामुळे राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेच्या (NABARD) कर्जवाटपाच्या धोरणानुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडे येणाऱ्या कर्जपुरवठ्याचे वाटप प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत करण्यासाठी सहकारी पतपुरवठा संस्थांचे योगदान महत्त्वाचे आहे.

८) **तारणावर कर्जपुरवठा :** सहकारी पतपुरवठा संस्था आपल्या सभासदांना स्थायी आणि अस्थायी स्वरूपाच्या मालमत्तेच्या तारणावर कर्ज देतात. कर्ज मंजूर करताना कर्जफेडीची हमी म्हणून दोन सभासदांचा जामीन द्यावा लागतो. उत्पादन कार्यासाठी कर्ज देतांना पीक तारण महत्त्वाचे मानले जाते.

९) **मर्यादित कर्जपुरवठा :** सहकारी पतपुरवठा संस्थांकडील भांडवल मर्यादित असल्यामुळे सभासदांकडून जेवढ्या कर्ज रकमेची मागणी केली जाते तेवढ्या रकमेचा कर्ज पुरवठा या संस्था करू शकत नाहीत. याचाच अर्थ या संस्था सभासदांना मर्यादित प्रमाणात कर्जपुरवठा करतात.

## ५.४ सहकारी पतपुरवठा संस्थेची कार्ये (Functions of Credit Co-operative Society) :



१) **ठेवी स्वीकारणे** : सहकारी पतपुरवठा संस्था व्यापारी बँकांप्रमाणे चालू, बचत, मुदत वा आवर्ती ठेव खात्यावर ठेवी स्वीकारण्याचे कार्य करतात. बचतीला प्रोत्साहन देण्यासाठी ठेवींवर आकर्षक व्याज दिले जाते.

२) **कर्जपुरवठा करणे** : सहकारी पतपुरवठा संस्था शेतकरी व सभासदांना बी-बियाणे, खते, कीटकनाशके, यांत्रिक अवजारे, सिंचनाची साधने इत्यादी खरेदी करण्यासाठी कर्जपुरवठा करते.

३) **कर्जाच्या वापरावर नियंत्रण व कर्जवसुली** : सहकारी पतपुरवठा संस्था कर्जवसुली व कर्जाच्या वापरावर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य करते. सभासदांना दिलेल्या कर्जाचा वापर योग्य कारणांसाठी होतो किंवा नाही यावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवते. तसेच दिलेल्या कर्ज रकमेची व्याजासह सुलभ हप्त्यामध्ये वसुली करते.

४) **भांडवल निर्मिती** : बचतीला प्रोत्साहन देऊन ठेवी स्वीकारणे, शेती उत्पादक कामांसाठी सभासदांना कर्जपुरवठा करणे, गरजेनुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज घेऊन सभासदांची भांडवलाची गरज पूर्ण करण्याचे कार्य पतपुरवठा संस्था करतात. यातूनच ग्रामीण भागातील बचतीचे भांडवलात रूपांतर होते.

५) **शासकीय योजनांमध्ये सहभाग** : केंद्र सरकार,राज्य सरकार तसेच नाबार्ड यांचेकडून कृषिक्षेत्राच्या विकासासाठी वेगवेगळ्या योजना आखल्या जातात. या योजनांच्या प्रत्यक्ष कार्यवाही मध्ये सहकारी पतपुरवठा संस्थांचा मोठा सहभाग असतो.

६) **आर्थिक सल्ला देणे** : सभासदांचे आर्थिक नुकसान होणार नाही या दृष्टीने आर्थिक कल्याण वा अधिकाधिक सुधारणा कशी होईल या अनुषंगाने सभासदांना आर्थिक मदती बरोबरच आर्थिक व्यवहारांच्या बाबतीत सल्ला देण्याचे कार्य सहकारी पतपुरवठा संस्था करते.

७) **समाज कल्याणकारी उपक्रमात सहभाग** : सहकारी पतपुरवठा संस्था त्यांच्या कार्यक्षेत्राच्या सामाजिक कल्याणाच्या दृष्टीकोनातून प्रयत्नशील असतात. ग्रामीण स्वच्छता, स्वच्छ पिण्याचे पाणी, प्रौढ साक्षरतेचा प्रसार, वृक्षारोपण, रक्तदान इत्यादी उपक्रमांना मदत करून परिसराच्या सामाजिक विकासासाठी योगदान देतात.

८) **लघु व कुटीर उद्योगांना सहाय्य** : ग्रामीण भागात स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्या व्यक्तिंना लघु व कुटीर उद्योगांच्या उभारणीसाठी आवश्यक असणारे कर्ज अल्प व्याज दराने पुरविण्याचे कार्य या संस्था करतात.त्यामुळे ग्रामीण भागात लघु व कुटीरोद्योगांचा विकास होतो.

९) **सहकाराचे शिक्षण आणि प्रशिक्षण** : ग्रामीण भागात अजुनही निरक्षरता आहे. सहकारी पतपुरवठा संस्थांच्या कार्यामुळे सभासदांना सहकाराच्या तत्वांचे, सहकारी जीवन पद्धतीचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शिक्षण दिले जाते त्याचबरोबर व्यावहारिक शिक्षणसुद्धा दिले जाते.

१०) **कृषिआधारित व्यवसायात वाढ करणे** : कृषी उत्पादनासाठी भांडवल पुरवठा केल्यामुळे कृषी उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन साखर कारखाने, सूत गिरण्या, डाळ मिल, पोहा मिल या सारख्या कृषिआधारित व्यवसायात वाढ घडवून आणण्याचे कार्य सहकारी पतपुरवठा संस्था करतात.

११) **विपणन कार्यासंदर्भात सभासदांना मार्गदर्शन** : सहकारी पतपुरवठा संस्था सभासद शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीबाबत मदत व मार्गदर्शन करतात. तसेच शेतमालाची मागणी, पुरवठा, किंमतीतील बदल, निर्यातीची शक्यता, निर्यातीची केंद्रे, निर्यात वाढीसाठी गुणवत्ता वाढ इ.बाबत माहिती देतात.

सहकारी पतपुरवठा संस्था त्यांच्या कार्यक्षेत्राच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी महत्त्वाच्या आहेत.



**कृती–**

**१) तुमच्या परिसरातील सहकारी पतपुरवठा संस्थेला भेट देऊन संस्थेच्या कार्याची माहिती मिळवा.**

## ५.५ सारांश

ग्रामीण भागातील लहान शेतकऱ्यांना योग्य व वाजवी व्याज दराने पुरेसा कर्जपुरवठा करणारी सहकारी तत्त्वानुसार कार्य करणारी संस्था म्हणजे सहकारी पतपुरवठा संस्था होय.

"मर्यादित साधन सामुग्री असणाऱ्या लहान शेतकऱ्यांजवळील उपलब्ध तारण स्वीकारून आणि त्यांच्या सोयीस्कर अटींवर बँकिंग व्यवहार करणारी संस्था म्हणजे सहकारी पतपुरवठा संस्था होय."

ग्रामीण भागातील लहान शेतकरी, शेतमजूर, लहान व्यावसायिक,कारागीर, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांना सहकारी पतपुरवठा संस्था कर्ज पुरवठा करतात. त्यामुळे सावकारांकडून केले जाणारे आर्थिक शोषण, फसवणूक यावर काही प्रमाणात पायबंद बसतो. केंद्र सरकार व राज्य सरकारच्या विविध योजना लाभार्थी व्यक्तिपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने सहकारी पतपुरवठा संस्था महत्वपूर्ण कार्य करतात. देशातील शहरी आणि ग्रामीण भागाचा समतोल आर्थिक विकास घडवून आणण्यामध्ये सहकारी पतपुरवठा संस्थांचे महत्वाचे योगदान आहे.ग्रामीण भागाचे औद्योगीकीकरण आणि रोजगार निर्मितीच्या दृष्टीने सहकारी पतपुरवठा संस्थांचे कार्य महत्वपूर्ण आहे.

### ❑ सहकारी पतपुरवठा संस्थांची वैशिष्ट्ये

१) खुले व ऐच्छिक सभासदत्व

२) संस्थेचा उद्देश

३) संस्थेचे कार्यक्षेत्र

४) मर्यादित भांडवल

५) कृषी उत्पादन साधनांच्या खरेदीसाठी कर्जपुरवठा

६) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांशी संलग्न

७) ग्रामीण पतपुरवठा रचनेत महत्वाचे स्थान

८) तारणावर कर्जपुरवठा

९) मर्यादित कर्जपुरवठा.

### ❑ सहकारी पतपुरवठा संस्थांची कार्ये

१) ठेवी स्वीकारणे

२) कर्जपुरवठा करणे

३) कर्जाच्या वापरावर नियंत्रण व कर्ज वसुली

४) भांडवल निर्मिती

५) शासकीय योजनांमध्ये सहभाग

६) आर्थिक सल्ला देणे

७) समाजकल्याणकारी उपक्रमात सहभाग

८) लघु व कुटीरोद्योगांना सहाय्य

९) सहकाराचे शिक्षण आणि प्रशिक्षण

१०) कृषिआधारित व्यवसायात वाढ करणे

११) विपणन कार्यासंदर्भात सभासदांना मार्गदर्शन

## ५.६ महत्वाच्या संज्ञा

१) **जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक –** राज्य सहकारी बँक आणि प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांना जोडणारा दुवा.

२) **राज्य सहकारी बँक / शिखर बँक –** सहकारी पतपुरवठ्याच्या रचनेतील सर्वोच्च बँक.

३) **राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (NABARD) –** राष्ट्रीय पातळीवर कृषी व ग्रामीण विकासाला कर्जपुरवठा करणारी बँक

## ५.७ स्वाध्याय

**प्र.१ अ) खालील दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

१) प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था ----- बँकाशी संलग्न असतात.
अ) भूविकास ब) नागरी सहकारी क) जिल्हा मध्यवर्ती सहकारी

२) ब्रिटिश राजवटीमध्ये ----- साली “सहकारी पतपुरवठा संस्था कायदा” समंत झाला.
अ) १९१२ ब) १९२५ क) १९०४

३) प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांचे कार्यक्षेत्र ----- पुरते मर्यादित असते.
अ ) राज्या ब )जिल्हया क) गावा

४) पूर्वीच्या काळी ग्रामीण भागात कर्जपुरवठा करणारा ----- हा एकमेव स्रोत होता.
अ) बँक ब) सावकार क) शेतकरी

५) सहकारी पतपुरवठा संस्थांमुळे सभासदांची ------- पासून मुक्तता झाली.
अ) सावकार ब) मध्यस्थ क) व्यापारी

## ब) योग्य जोड्या जुळवा

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| अ) सहकारी पतपुरवठा संस्थांचा कर्जपुरवठा | १) अनुत्पादक कार्यासाठी |
| ब) सहकारी पतपुरवठा संस्थांचे कार्यक्षेत्र | २) बचतीला प्रोत्साहन |
| क) सहकारी पतपुरवठा संस्थांचा कारभार | ३) फक्त शहरी भागात कार्य |
| ड) ठेवी स्वीकारणे | ४) उत्पादक कार्यासाठी |
| | ५) हुकूमशाही पद्धत |
| | ६) उधळपट्टीस प्रोत्साहन |
| | ७) ग्रामीण व शहरी भागात कार्य |
| | ८) लोकशाही पद्धत |

## क) खालील विधानांसाठी एक शब्द/शब्दसमूह लिहा.

१) गरजू व्यक्तिंना कर्जपुरवठा करणारी सहकारी संस्था

२) दुर्बल घटकांना वाजवी व्याज दरात कर्जपुरवठा करणारी ग्रामीण भागातील सहकारी संस्था

३) सावकारांच्या फसवणूकीपासून शेतकऱ्यांना मुक्त करणारी सहकारी संस्था

४) सहकारी पतपुरवठ्याच्या रचनेतील सर्वोच्च बँक

## ड) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.

१) ग्रामीण भागात आजही शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणारा सावकार हा एकमेव स्रोत आहे.

२) सहकारी पतपुरवठा संस्था या आपल्या सभासदांना फक्त कर्जपुरवठा करतात.

३) ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासामध्ये सहकारी पतपुरवठा संस्थांना महत्त्व आहे.

४) सहकारी पतपुरवठा संस्था अमर्यादित प्रमाणात कर्जपुरवठा करतात.

## इ) खालील विधाने पूर्ण करा.

१) भारतात सहकारी चळवळीची सुरुवात .............. संस्थांच्या स्थापनेद्वारे झाली.

२) सहकारी पतपुरवठ्याची रचना ............ स्तरीय आहे.

३) सहकारी पतपुरवठा संस्थांचे सभासदत्व सर्वांसाठी खुले व .......... असते.

४) शेतमजूर, लहान कारागीर, दुर्बल घटक यांची भाग खरेदी क्षमता खूपच ......... असते.

५) शिखर बँक .......... पातळीवर कार्य करते.

**(फ) अचूक पर्याय निवडा.**

| | |
|---|---|
| १) ____ | प्रत्यक्ष सभासदांशी व्यवहार |
| २) भाग खरेदी क्षमता कमी | ____ |
| ३) ____ | राज्य सहकारी बँक |
| ४) प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था व शिखर बँक यांच्यातील दुवा | ____ |
| ५) ____ | राष्ट्रीय पातळीवर कृषी कर्ज पुरवठा |

नाबार्ड, शेतमजूर, सावकार, शिखर बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मध्यस्थ, प्राथमिक पतपुरवठा संस्था

**ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सहकारी पतपुरवठा संस्था म्हणजे काय ?

२) सहकारी पतपुरवठ्याची त्रिस्तरीय रचना कशा प्रकारची असते ?

३) पूर्वीच्या काळी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा कोणाकडून केला जात होता ?

४) भारतात सहकारी पतपुरवठा संस्था कायदा कोणत्या वर्षी संमत झाला ?

५) सहकारी पतपुरवठा संस्था कोणत्या प्रकारच्या ठेवी स्वीकारतात ?

**ह) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करुन वाक्य पुन्हा लिहा.**

१) सहकारी पतपुरवठा संस्था <u>दीर्घ</u> मुदतीचा कर्जपुरवठा करतात.

२) पतपुरवठा सहकारी संस्थांची भांडवल उभारणी क्षमता <u>प्रचंड</u> असते.

३) सहकारी पतपुरवठा संस्था <u>विना तारणावर</u> कर्ज पुरवठा करतात.

**ई) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) अ) चालू ठेव ब) बचत ठेव
क) कर्ज ड) मुदत ठेव

२) अ) राज्य सहकारी बँक ब) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
क) प्राथमिक पतपुरवठा संस्था ड) स्टेट बँक ऑफ इंडिया

**ज) योग्य क्रम लावा.**

१) अ) प्राथमिक पतपुरवठा सहकारी संस्था ब) राज्य सहकारी बँक
क) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

**प्र. २ खालील संज्ञा स्पष्ट करा.**

१) सहकारी पतपुरवठा संस्था

२) राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड)

**प्र.३ स्वमत लिहा./ उपयोजनावर आधारित प्रश्न.**

१) ''कृषी उत्पादनासाठी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणाऱ्या सहकारी पतपुरवठा संस्था महत्त्वाचे कार्य करतात'' याबाबत आपले मत लिहा.

२) ''सहकारी पतपुरवठा संस्थांमुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे रोजगार उपलब्ध होतो'' याबाबत आपले मत व्यक्त करा.

**प्र.४ टीपा लिहा.**

१) सहकारी पतपुरवठा संस्था अर्थ व व्याख्या.

२) सहकारी पतपुरवठा संस्थेचे कार्ये

३) सहकारी पतपुरवठा संस्थेची वैशिष्ट्ये

**प्र.५ कारणे लिहा.**

१) ग्रामीण पतपुरवठा रचनेमध्ये सहकारी पतपुरवठा संस्थांना महत्त्वाचे स्थान आहे.

२) सहकारी पतपुरवठा संस्थांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची मदत घ्यावी लागते.

३) लहान शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी पतपुरवठा संस्थांची गरज असते.

**प्र.६ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) सहकारी पतपुरवठा संस्थेची वैशिष्ट्ये लिहा.

२) सहकारी पतपुरवठा संस्थेचा अर्थ व व्याख्या लिहा.

३) सहकारी पतपुरवठा संस्थेची कार्ये लिहा.

**प्र.७ दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) सहकारी पतपुरवठा संस्थेची व्याख्या लिहून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) सहकारी पतपुरवठा संस्थेची कार्ये स्पष्ट करा.

◆◆◆